## प्रेस नोट

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : २९.०९.२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | १.सौ.शुभांगी बाळकृष्ण कोकाटे, वय ४३ वर्षे, पद– ग्रामसेवक, ग्रामपंचायत बोबदो ता.धारणी जि.अमरावती, ह.मु.फ्लॅट क्र.१०१, गजानन रेसिडेंन्सी क्र.२ ता.धारणी जि.अमरावती, मुळ पत्ता – रा. शेलवाडी पो.आंद्रा ता.मुर्तीजापूर जि.अकोला, वर्ग – ३.<br>२.सौ.सविता हरी धांडे, वय ३८ वर्षे, पद–सरपंच ग्राम बोबदो ग्रामपंचायत ता.धारणी जि.अमरावती, रा.बोबदो ता.धारणी जि. अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | २९/०९/२०२२ चे १६/३० ते १७/१५ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ४०,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ४०,०००/– रुपये |
| ७ | घटनास्थळ | आलोसे क्र.१ यांचे खाजगी कार्यालय, शिक्षक बॅंक कॉलनी धारणी जि.अमरावती |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १३/०९/२०२२ रोजी आमचे समक्ष तक्रार दिली की, ग्रा.प. बोगदो अंतर्गत रोहणीखेडा येथील शौचालय दुरूस्ती चे काम दिनांक २५.०२.२०२० ला सुरू करून दिनांक २५.०५.२०२० ला काम पुर्ण केले. सदर कामाचे देयकाची ग्रामसेवक श्रीमती कोकाटे मॅडम याच्या कडे मागणी केली असता ग्रामसेवक यांनी त्यांना १४९०००/–रूपयातुन फक्त ३० हजार चा देयक दिला व त्यानंतर ६० हजारचा देयक दिला नंतर बाकीचे देयक देण्याकरीता ग्रामपंचयात बोबदो येथील सरपंच श्रीमती धांडे व ग्रामसेवक श्रीमती कोकाटे यांनी एकूण ५०,०००/– रुपय लाचेची मागणी करीत असल्याबाबत सविस्तर तक्रार प्राप्त झाली.

सदर तक्रारीवरुन दि.१३/०९/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.१ दरम्यान पंचासमक्ष ग्रामसेवक श्रीमती कोकाटे यांनी तक्रारदार यांनी केलेल्या कामाचे देयकाचे चेक देण्याकरीता २०,०००/–रु. लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले. तसेच दिनांक २८/०९/२०२२ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही क्र.२ दरम्यान पंचासमक्ष सरपंच श्रीमती धांडे यांनी सदर देयकाचा चेक देण्याकरीता तडजोडी अंती २०,०००/– लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम ही ग्रामसेवक मॅडम कोकाटे यांना यांचेकडे देण्याचे तक्रारदार यांना सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

आज दिनांक २९/०९/२०२२ आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान ग्रामसेवक श्रीमती कोकाटे यांनी त्यांचे व सरपंच श्रीमती धांडे यांचे असे पंचासमक्ष एकुण ४०,०००/– रुपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद दोन्ही आरोपींतांनविरुध्द पो.स्टे. धारणी, अमरावती ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, श्री.अरुण सांवत, अपर पोलीस अधीक्षक, श्री.देविदास घेवारे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.संजय महाजन, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि.योगेशकुमार दंदे, पो.नि.अमोल कडू, पो.ना.युवराज राठोड, पो.कॉं.शैलेश कडू, मनापोकॉं. स्वाती सरोदे चा.पोउपनि.सतिश किटूकले यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं. ०७२१–२५५२३५५, मो.न.७०२०६९३४८९, टोल फ्रि नंबर – १०६४.

(योगेशकुमार दंदे)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती